शा. मु. को.— आर्डि. (जे) क्यूबी ३७७–२४,०००–४·७१

# नमुना क्रमांक २२

## लेखा परीक्षा अहवाल ( सहकारी दुग्धशाळा संस्था )

## विभाग – दुसरा

१) बाहेरील कर्जे

(१) आपल्या व्यवसायासाठी संस्थेने मिळविलेली विविध स्वरूपाची कर्जे व पतमर्यादा लिहा.

| अनुक्रमांक | कर्ज वा पतमर्यादा यांचा प्रकार | कारण | मंजूर रक्कम | उचललेली कमाल रक्कम | परतफेड | येणेबाकी | थकबाकी | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |

(२) कर्जव्यवहार समाधानकारक आहे काय? कर्जे आणि पतमर्यादा देताना घातलेल्या शर्तींचा भंग झाला आहे काय?

२) शासकीय आणि अन्य आर्थिक सहाय्य :–

(१) संस्थेला मिळालेले शासकीय आणि अन्य आर्थिक सहाय्य लिहा.

(२) ज्या कारणासाठी सहाय्य दिले आहे त्या कारणासाठी ते वापरले जाते काय?

३) दूध प्रापण (प्रोक्युरमेंट) आणि पुरवठा :–

(१) दुधाच्या संकलनाची, साठ्याची आणि घृतांश चाचणीची ( फॅट टेस्टींग ) व्यवस्था पुरेशी आहे काय?

(२) (अ) घृतांशाचे कमीत कमी किती शेकडा प्रमाण असल्यास दूध खरेदी करण्यांत येते ?

(ब) सभासदाकडून आलेल्या दुधाची योग्य रीतीने पोहोच दिली जाते काय ?

(३) ज्या ठिकाणाहून आपल्या सभासदांकडून संस्था दूध प्रापण करते त्या दूध गोळा करणाऱ्या केंद्रांची संख्या लिहा.

(४) लेखा परीक्षेच्या काळात प्रापण करून संयुक्त संस्थेला किंवा शासनाला दिलेल्या दुधाचे एकूण परिमाण आणि त्याची किंमत खालीलप्रमाणे लिहा–

(अ) एकूण खरेदी केलेल्या दुधाचे परिमाण

| | लिटर | रक्कम |
|---|---|---|
| (१) सभासदांकडून | | |
| (२) बिगर सभासदांकडून | | |

(ब) संयुक्त संस्थेला किंवा शासकीय योजनेला पुरविलेल्या दुधाचे एकूण परिमाण

(क) ग्राहकांना परस्पर विकलेल्या दुधाचे एकूण परिमाण

(५) संयुक्त संस्थेला किंवा शासनाला पुरवठा केलेल्या दुधावर संस्थेने किती अडत (कमिशन) मिळवले आहे ?

( मागे पहा )

(६) सभासदांकडून खरेदी केलेल्या दुधाचा खरेदी दर काय आहे? बिगर सभासदाकडून खरेदी केलेल्या दुधाचा दर काय आहे?

(७) (अ) संयुक्त संस्थेला किंवा शासनाला दिलेल्या दुधाचा विक्री दर काय आहे ?

(ब) वाहतुकीच्या खर्चाचा त्यात समावेश आहे काय ?

(क) ग्राहकांना परस्पर पुरवठा केलेल्या दुधाचा विक्री दर काय आहे ?

(ड) त्यात तूटी आहेत काय ? असल्यास, त्या व्यवस्थापन समितीने मंजूर केल्या आहेत काय ?

(८) संयुक्त संस्थेला किंवा शासकीय योजनेला मान्य केलेल्या दुधाच्या परिमाणाचा पुरवठा करण्यात संस्था यशस्वी झाली आहे काय ?

(९) विक्रीसाठी दुधाचे पदार्थ संस्था करते काय ते लिहा.

(१०) कांही उधार विक्री आहे काय ? पोटनियमानुसार त्या अधिकृत आहेत काय ? अशा विक्रीत गुंतलेली एकूण रक्कम लिहा. ह्या रकमांच्या वसूलीसाठी काय प्रयत्न केले आहेत ते लिहा.

४) **अन्य व्यवसाय :-**

(१) चारा-वैरणीचा व्यवहार संस्था करते काय ते लिहा. आपल्या सभासदांना पशुखाद्याचा ती पुरवठा करते काय ? असल्यास, पुरवठा केल्याचे एकूण परिमाण आणि किंमत द्या.

(२) चारा-वैरण आणि पशुखाद्य यांची शिल्लक मालाची पुस्तके योग्य प्रकारे ठेवली आहेत काय ?

(३) चारा-वैरणीच्या लागवडीखाली किंवा गुरांच्या चराईसाठी संस्थेजवळ जमीन आहे काय ? असल्यास, अशा जमिनीचे क्षेत्र द्या.

(४) सभासदांची गुरे चरण्यासाठी संस्थेने खंडाने जमीन घेतली आहे काय ? वार्षिक खंड काय आहे ?

(५) (अ) संस्थेजवळ दुभती जनावरे आहेत काय ? असल्यास, संस्थेच्या मालकीच्या म्हशींची व गाईंची संख्या लिहा आणि त्यांच्यापासून मिळालेल्या दुधाचे परिमाण लिहा.

(ब) प्रत्येक गुरापासून निघालेले दूध दाखविणारी नोंदवही संस्थेने ठेवली आहे काय ?

(६) गुरांचा विमा उतरविला आहे काय ते लिहा.

(७) स्वत:च्या निधीतून किंवा शासकीय निधीतून संस्थेने गोदामे आणि गोठे बांधले आहेत काय ते लिहा.

(८) दुधाच्या प्रापणासाठी आणि योग्य साठवणासाठी संस्थेने आरोग्यविषयक सावधगिरी घेतली आहे काय ते लिहा.

(९) घृतांशाची चाचणी संस्थेच्या केंद्रावर करतात का संयुक्त संस्थेत करतात ते लिहा.

५) कर्ज व्यवहार :–

(१) गाई आणि म्हशी खरेदी करण्यासाठी सभासदांना दिलेल्या व्यक्तिगत मर्यादा काय आहेत ?

(२) ठरवून दिलेल्या मर्यादेत कर्जे मंजूर केली आहेत काय ?

(३) (अ) पुरेशी जमानत घेतली आहे काय ते लिहा.
(ब) घेतलेल्या जमानतीचे स्वरूप लिहा.

(४) दुभत्या जनावरांच्या खरेदीसाठी सभासदांना दिलेल्या कर्जावरील व्याजाचा दर लिहा.

(५) (अ) करारानुसार कर्जदार सभासद दुधाचा पुरवठा संस्थेला करतात काय ?
(ब) नसल्यास, अशा कसूर करणाऱ्यांची संख्या द्या.

(६) दिलेल्या कर्जाचा खालीलप्रमाणे तपशील द्या:—

| अनुक्रमांक | कर्जाचा प्रकार | कारण | मंजूर रक्कम | दिलेली रक्कम | परत फेड केलेली रक्कम | येणे रक्कम | थकबाकी | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |

(७) दिलेली कर्जे ज्या कारणासाठी मंजूर झाली आहेत त्या कारणासाठी वापरतात काय ? भंग असल्यास नोंद करा.

६) बुडीत आणि संशयित कर्जे –

(१) संस्थेने तयार केलेल्या यादीनुसार बुडीत आणि संशयित कर्जाच्या रकमा वेगवेगळ्या द्या.

(२) अशा याद्या संस्थेने तयार केल्या नसल्यास, व्यवस्थापनाकडे आवश्यक त्या चवकशा करून असे अंदाज तयार करा आणि संबंधित आकडे द्या.

७) दुधाची वाहतूक :-

(१) संस्थेजवळ स्वतःच्या बंद दूधवाहिका (व्हॅन्स) आणि मालमोटारी आहेत काय ? असल्यास, रोजवह्या (लॉगबुक्स) योग्य प्रकारे ठेवल्या आहेत काय ?

(२) वाहनावर पुरेशी झीज आकारली आहे काय ते लिहा.

(३) (अ) जर संस्थेजवळ स्वतःची वाहने नसतील, तर संयुक्त संस्थेकडे किंवा शासकीय योजनेकडे दूध वाहतुकीची काय व्यवस्था केली आहे ते लिहा.
(ब) संयुक्त संस्थेने आपल्या वाहनातून दुधाची वाहतूक केली असेल तर संस्थेकडून वसूल केलेल्या रकमा लिहा.

(४) सकाळ आणि संध्याकाळच्या खेपांसाठी दूध वितरण नोंदवह्या योग्यप्रकारे ठेवल्या आहेत काय ? त्या अद्यावत लिहिल्या आहेत काय ?

(५) वाहतुकीचा खर्च संस्थेला वाजवी आणि काटकसरीचा आहे काय ते लिहा.

८) सहकारी शिस्त संकेत:--

(१) संस्था संयुक्त संस्थेला सामील आहे काय ?

(२) करारानुसार संस्थेने संयुक्त संस्थेला नियमित दुधाचा पुरवठा ठेवला आहे काय ?

(३) दूध पुरवठ्याबाबत वैयक्तिक सभासद संस्थेशी एकनिष्ठ आहेत काय ? या दृष्टिकोनाची सावारण अभिप्रायात चर्चा करा.

(४) सभासदांच्या गुरांना आवश्यक पशुखाद्य आणि चारा-वैरण पुरविण्याचे प्रयत्न संस्थेने केले आहेत काय ?

९) खर्च :-

(१) खर्चाची पत्रके व्यवस्थापन समितीपुढे मंजुरीसाठी ठेवतात काय ?

(२) वार्षिक अंदाजपत्रके तयार करून ती व्यवस्थापन समिती आणि सावारण सभा यांच्याकडून मंजूर करून घेतात काय ?

(३) विविध बाबीवर झालेला खर्च अंदाजपत्रकाच्या मर्यादेत आहे काय ? नसल्यास, पुनर्विनियोजन ( रीॲप्रोप्रिएशन साधारण सभेने मान्य केले आहे काय ?

१०) तपासण्या :-

(१) खालील अधिकाऱ्यांनी घेतलेल्या तपासण्यांची संख्या लिहा. तपासण्यांचा कालावधी आणि दिनांक नमूद करा.

(१) सहकारी खात्याचे अधिकारी

(२) दुग्धशाळा विकास खात्याचे अधिकारी,

(३) मध्यवर्ती पैसे पुरवणाऱ्या माध्यमाचे अधिकारी.

(४) संयुक्त संस्थेचे अधिकारी.

(२) सर्व तपासणी टिप्पण्यांचे संस्थेने अनुपालन केले आहे काय? तुमचे अभिप्राय द्या.

११) कर्मचारीवर्ग :--

(१) संस्थेने प्रशिक्षित आणि तांत्रिक कर्मचारीवर्ग नेमला आहे काय ? कर्मचारीवर्ग पुरेसा आहे काय ?

(२) कर्मचारीवर्गाकडून पुरेशा जमानती घेतल्या आहेत काय ?

(३) कर्मचारीवर्गासाठी सेवा नियम तयार केले आहेत काय ?

(४) कर्मचारीवर्गाच्या नेमणूकीसाठी आवश्यक तेथे सक्षम प्राधिकाऱ्याची मंजूरी घेतली आहे काय ते लिहा.

लेखा परीक्षा अधिकाऱ्याची सही व पदनाम